आर.एन्.आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र.नं. – MAHMAR-36829-2010

ISSN - 2229-4929
UGC Approved and Peer Reviewed Journal

# अक्षर वाङ्‌मय

वर्ष : दहावे अंक : दुसरा
ऑक्टोबर–नोव्हेंबर–डिसेंबर २०१९

※ संपादक ※
डॉ. नानासाहेब सूर्यवंशी
※ कार्यकारी संपादक ※
डॉ. शिवाजीराव देशमुख
※ मार्गदर्शक ※
डॉ. अरुण प्रभुणे
※ संपादक मंडळ ※
डॉ. सतीश कदम डॉ. दीपक चिद्दरवार
डॉ. विजय वारकड डॉ. महादेव वाळुंज

**प्रकाशक** : सौ. रेखाताई नानासाहेब सूर्यवंशी, प्रतीक प्रकाशन,
'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर ४१३५१५

**मुद्रक** : कॉम्पप्रिन्ट कल्पना प्रा. लि. ४१६/४ सदाशिव पेठ, पुणे ३०.

**साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ता : डॉ. नानासाहेब सूर्यवंशी**
'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर, ता. अहमदपूर
जि. लातूर ४१३५१५. भ्रमणध्वनी : ९४२३६५५८४१

E-mail : suryawanshinanasaheb67@gmail.com

वार्षिक वर्गणी : रु. ५००/–
द्विवार्षिक वर्गणी : रु. ९००/–
पंचवार्षिक वर्गणी : रु. २०००/–
अंकाचे मूल्य : रु. १२५/–

※ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

※ या अंकातील लेखांतून व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.



Scanned with OKEN Scanner

# संपादक मंडळ

## संपादक

* डॉ. नानासाहेब सूर्यवंशी, पदव्युत्तर मराठी विभाग प्रमुख, श्री संत गाडगे महाराज महाविद्यालय, लोहा, जि. नांदेड भ्रमणध्वनी : ९४२३६५५८४१.
  Email : suryawanshinanasaheb67@gmail.com.

## कार्यकारी संपादक :

* 'राजमाची', ४/१८, विद्यानगर हाऊसिंग सोसायटी, सोलापूर
  भ्रमणध्वनी : ९४२३०६७२८०

## मार्गदर्शक :

* डॉ. अरुण प्रभुणे
  ३९८७, ॲव्हिग्रॉन लेन, सॅन होजे, कॅलिफोर्निया, अमेरिका – ९५१३५.
  Email : arun_prabhune@yahoo.co.in
  अमेरिकेतील संपर्कासाठी : ००१४०८५३२१६८३
  भारतात संपर्कासाठी : ९४२२४६८०६२ / ९४२२४६९७५१

## संपादक मंडळ :

* **डॉ. दीपक चिद्दरवार**
  **मराठी विभाग, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर, जि. लातूर**
  **भ्रमणध्वनी : ९४२१०९३१७७** Email : deepakrambhau@gmail.com

* **डॉ. महादेव वाळुंज**
  **'शिवनेरी', लक्ष्मीमाता मंदिर, अंबिका नगर, इंदापूर, जि. पुणे – ४१३१०६**
  **भ्रमणध्वनी : ७५८८०३४७१९**
  Email : mahadeowalunj@gmail.com
* **डॉ. विजय वारकड, मराठी विभाग**
  **महात्मा फुले महाविद्यालय, मुखेड, जि. नांदेड**
  **भ्रमणध्वनी : ९४२१४८५८६८**
* **डॉ. सतीश कदम, मराठी विभाग प्रमुख**
  **दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर, जि. नांदेड**
  **भ्रमणध्वनी : ९४२३३३१५३०**

□□□



Scanned with OKEN Scanner

# अनुक्रमणिका



| अ.क्र. | शीर्षक | लेखक/लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १) | महात्मा बसवण्णांच्या वचनसाहित्यातील विषमताविरोधी विचार | डॉ. दत्ता पाटील | ९ |
| २) | प्रज्ञा पवार यांच्या कवितेतील सामाजिक विषमतेचे चित्रण | प्रिं. डॉ. शिवलिंग मेनकुदळे | १३ |
| ३) | तथागत गौतम बुद्धांचे समतेचे विचार व कार्य | प्रा. डॉ. सुभाष वाघमारे | १६ |
| ४) | अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील स्त्री शोषणाचे चित्रण | डॉ. दत्तात्रय बारबोले | २२ |
| ५) | दलित साहित्यातील विषमतेचा हुंकार | डॉ. प्रतिभा जाधव-निकम | २५ |
| ६) | आदिवासी कादंबरीतील विषमतेची चित्रण | डॉ. के. के. पवार | २८ |
| ७) | बारोमास वास्तवतेचे जिवंत चित्रण | डॉ. मेघमाला मेश्राम | ३४ |
| ८) | संताची संमतेची गुढी | डॉ. दत्तात्रय डुंबरे | ३८ |
| ९) | भटक्या विमुक्त पारधी साहित्यातील सामाजिक विषमतेचे चित्रण | प्रा. अनिल बांगर | ४१ |
| १०) | श्रीराम दुर्गे यांच्या क्षितीजापलिकडचा सुर्य | डॉ. संजय पाटोळे | ४७ |
| ११) | ग्रामीण कादंबरीतील लिंग व्यवस्थेतून चित्रीत झालेली विषमता | डॉ. वाघमोडे एस. बी. | ५९ |
| १२) | तुकाराम : सामाजिक विषमतेवर प्रहार करणारा योध्दा संत | डॉ. मानसी लाटकर | ६२ |
| १३) | संघर्षमय जीवनाची कहाणी उचल्या आत्मकथन | डॉ. कांचन नलावडे | ६८ |
| १४) | दलित आत्मकथनाचा परिपेक्षातून भटक्या जमातीच्या | डॉ. शैलजा शिंदे | ७० |
| १५) | दलित साहित्यातील सामाजिक समतेचे व विषमतेचे चित्रण | डॉ. विजया पाटील | ७५ |
| १६) | मराठी दलित कवितेतील विषमतेचे चित्रण | डॉ. आनंदा वारके | ७९ |
| १७) | महानुभव पंत यांच्या मौखिक परंपरा – काही निष्कर्ष | डॉ. बाळकृष्ण लळित | ८३ |
| १८) | संत तुकाराम महाराज यांच्या साहित्यातील विज्ञान | डॉ. दीपक सुभाषराव सुर्यवंशी | ८६ |
| १९) | जागतिकीकरणातील सामाजिक व शैक्षणिक विषमता | डॉ. डी. बी. सोळुंके | ९० |
| २०) | दलित साहित्यातील विषमतेचे चित्रण | डॉ. शकुंतला एम. भारंबे | ९३ |
| २१) | आदिवासी साहित्यातील विषमतेचे चित्रण | प्रा. सुरकुले अनिता सोमनाथ | ९६ |
| २२) | माडगुळकरांच्या कथेतील उपेक्षितांचे चित्रण | प्रा. बाळासो सुतार / आशा विठ्ठल सुतार | ९८ |
| २३) | 'कोल्हाट्याचे पोर' या आत्मकथनातील विषमतेचे चित्रण | प्रा. सर्वगोड एन.सी. | १०२ |
| २४) | दलित साहित्यातील सामाजिक समतेचे चित्रण | श्री. राहूल भागवत गायकवाड | १०५ |
| २५) | जात – धर्म – लिंगभाव एक दृष्टीकोण | प्रा. एम. के. शिंदे | १०९ |
| २६) | ग्रामीण साहित्यातील धर्म जात व लिंग आधारित विषमतेचे चित्रण | प्रा. निलेश मधुकर लंगोटे | ११४ |
| २७) | सुबोध जावडेकरांच्या गुगली आणि आकाश भाकिते ..... | डॉ. सचिन गंगाधर गिरी | ११७ |
| २८) | स्त्रीवाद साहित्यातील धर्म, जात व लिंग यावर आधारित .... | प्रा. सोनवणे राहूल बापुराव | १२० |
| २९) | चित्रा कादंबरीतील स्त्री दर्शन | डॉ. माने हनुमंत तुकाराम | १२३ |
| ३०) | भटक्या विमुक्त विषमतेचे चित्रण | डॉ. अतुल नारायण चौरे | १२६ |
| ३१) | दलित साहित्यातील धर्म, जात व लिंग विषमतेचे चित्रण | डॉ. किरण प्रभाकर वाघमारे | १३० |
| ३२) | स्त्रीवादी साहित्यातील विषमतेचे चित्रण | कु. निकिता अनिल शेंडगे | १३६ |
| ३३) | जागतिकीकरण आणि ग्रामीण साहित्य | प्रा. सचिन पोपट सवने | १३८ |
| ३४) | स्त्रीवादी साहित्यातील धर्म, जात व लिंग यावर आधारित .... | डॉ. जगदाळे किरण आगतराव | १४३ |
| ३५) | सुशिक्षित बेरोजगार तरूणांच्या दैन्यावस्थेचा दाहक अविष्कार .... | डॉ. दादाराव एकनाथ गुंडरे | १४६ |
| ३६) | अंतर्गत मानसिक पडझडीचे चित्रण करणारी मराठी प्रायोगिक कथा | डॉ. युवराज देवाळे | १४९ |
| ३७) | दलित कवितेतील सामाजिक विषमतेचे व समतेचे चित्रण | डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे | १५२ |
| ३८) | जागतिकीकरणानंतरच्या मराठी ग्रामीण कवितेतील सामाजिक .... | डॉ. एन. व्ही. शिंदे | १५९ |
| ३९) | दलित संत चोखामेळा व रोहिदास यांच्या काव्यातून अभिव्यक्त | श्री. राहूल विनोदराव राऊत | १६२ |
| ४०) | आदिवासी कादंबरीतील सामाजिक विषमता | प्रा. विनायक राऊत | १६५ |
| ४१) | जागतिकीकरणाचा नंतरच्या मराठी साहित्यातील समतेचे .... | प्रा. सुरवसे तुकाराम नागनाथ | १७० |
| ४२) | वर्तमान समाजव्यवस्थेतील विषमता वळवाचे पाणी | डॉ. जयदेवी पवार | १७३ |
| ४३) | ग्रामीण साहित्य कृती 'तहान मधील मुल्यात्मक संघर्ष | डॉ. विजय झुंजाराव | १७५ |
| ४४) | कविता महाजन यांच्या कादंबरीतील विषमतेचे चित्रण | डॉ. सुवर्णा नामदेव पाटील | १७९ |
| ४५) | जागतिकीकरणात उत्तम कांबळे यांच्या कविता | डॉ. शशिकला भिमराव रणदिवे | १८२ |
| ४६) | स्त्रीवादी साहित्यातील विभावरी शिरुरकर, ताराबाई शिंदे ..... | सौ. कुंभार शुभांगी तानाजी | १८९ |
| ४७) | दलित साहित्यातील धर्म, जात व लिंग यावर आधारित ..... | डॉ. आचार्य आर. डी. | १९२ |
| ४८) | डॉ. बाबासाहेब आंबेडकर -एक स्त्री उध्दारक | प्रा. मीरा माधवराव देठे | १९४ |
| ४९) | 'मरणकला' आत्मकथनातील स्त्री चित्रण | प्रा. मीरा माधवराव देठे | १९९ |
| ५०) | दलित कथेतील राजकीय विषमतेचे चित्रण | डॉ. मधुकर बैकरे | २०१ |
| ५१) | मराठी कवितेतील धर्म, जात व लिंग विषयक विषमतेचे चित्रण | डॉ. जनार्धन दामू परकाळे | २०५ |
| ५२) | दलित साहित्यातील प्रश्न व समस्या | डॉ. भरत भिमराव जाधव | २०९ |





Scanned with OKEN Scanner

# सुशिक्षित बेरोजगार तरूणांच्या दैन्यावस्थेचा दाहक अविष्कार : बारोमास

प्रा. डॉ. दादाराव गुंडरे
मराठी विभाग प्रमुख,
शिक्षणमहर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय,
कळंब जि. उस्मानाबाद.

साहित्य आणि समाज यांचा अन्योन्य सहसंबंध असून तत्कालीन परिस्थितीची नोंद साहित्य घेते. सभोवतीच्या समाजवास्तवास अभिव्यक्त करण्याचे, कलात्मक रुप देण्याचे काम साहित्यिक करतात. कालानुरुप, परिस्थितीनुरुप मराठी साहित्याचे स्वरुप आशय, अविष्कारासह बदलत गेले. प्रामुख्याने १९६० नंतर मराठी साहित्यात ठळकपणे जे प्रवाह उदयास आले. त्यामध्ये दलित आदिवासी, स्त्रीवादी, जनवादी, खिस्ती, मुस्लीम तसेच ग्रामीण साहित्याचा समावेश होतो. ज्या ग्रामीण साहित्याच्या केंद्रस्थानी शेती व शेतकरी असतो. कृषीकेंद्रित ग्रामव्यवस्था, कृषीनिष्ठ मूल्यव्यवस्था यांना आदर्श मानून ग्रामजीवनाचा गावगाड्याचा वास्तवदर्शी वेध घेत अनेकांनी ग्रामीण साहित्यास मोलाचे स्थान मिळवून दिले. या साहित्याच्या निर्मिती काळाबाबत अभ्यासकात मतभिन्नता असली तरी महात्मा फुले, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासारख्या महामानवांच्या वैचारिक व जीवनकार्य निष्ठेच्या प्रेरणेतून ते अवतीर्ण झालेले दिसते. शेती व शेतीशी निगडीत असणा—यांच्या उत्थानासाठी शोषणमुक्त समाजासाठी ग्रामीण साहित्य चळवळ उभारल्याचे दिसते. कृषीप्रधान देशातील बहुसंख्य ग्रामनिवासी, शेतीव्यवसाय करणा—या शेतकरी शेतमजूर अर्था ग्रामजीवनाची सर्वकश नोंद ग्रामीण साहित्याने घेतली. कथा, कविता, ललित तसेच कादंबरी या प्रकारातून 'ग्रामीण साहित्य' हा प्रवाह अविष्कृत झाला. जीवनाचे बहुकेंद्रित्व, माणसाची बहुलता, परिस्थितीची संमीश्रता, जीवनकथनाच्या शक्यता हाताळण्यास भरपूर अवकाश तसेच दीर्घकथनाची परंपरा लाभलेल्या 'कादंबरी' या प्रकाराने ग्रामीण साहित्यात स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले.

१९६० नंतर स्थिरावलेल्या ग्रामीण साहित्य प्रवाहाने १९९० नंतर एक वेगळे वळण घेतले. त्यास मराठी ग्रामीण कादंबरीने मोलाची भर घातली. याला कारण जागतिकीकरणाने ग्रामजीवन, समाजमन, कलावंताच्या मानसिकतेवर आघात झाले. कृषीजीवन पार ढवळून निघाले. १९९० नंतर 'खाउजा' चा उदय झाला. या सर्वव्यापी संकल्पनेने शेती व शेतकरी यांच्यावर मोठा आघात केला. भांडवलदारी संस्कृतीचा उदय तर कृषीसंस्कृती गावगाड्याचा विध्वंस झाला. ग्रामीण साहित्याच्या मुळाशी असलेल्या ग्रामीण परीघाचे स्वरुप संपूष्टात येवू लागले. विकृत बाजारु मूल्यव्यवस्थेने शेती व शेतक—यासमोर अनेक प्रश्न उभे केले. अस्मानी—सुलतानी संकटग्रस्त ग्रामजीवन, शहरीकरणाचा प्रभाव, बदलती जीवनशैली, पारंपारिक शेतीस फाटा, महागाई, कर्जबाजारीपणा, बेकारी, शेतक—यांच्या आत्महत्या, भष्ट्राचार, दारिद्र्य, नातेसंबंधात दुरावा, अनैतिकता, असुरक्षितता यासारख्या अनेक प्रश्नांना जागा करुन दिली. जागतिकीकरणाच्या प्रकियेने ग्रामीण भागाचे होणारे उद्ध्वस्तीकरण, शेती व खेड्याचे विद्रुषीकरण केले. या सर्व परीघास, घडामोडीस मराठी ग्रामीण कादंबरीने कवेत घेतले. ग्रामीण माणसाला पोळणारी धग आणि समकालीन वास्तव अविष्कृत केले. त्यामध्ये मोहन पाटील, विश्वास पाटील, रविंद्र शोभणे, राजन गवस, बाबाराव मुसळे, शेषराव मोहिते, तानाजी पाटील, गोविंद देशपांडे, प्रकाश केजकर, कृष्णात खोत, भीमराव वाघचौरे, रमेश अंधारे, प्रविण बांदेकर, भारत काळे, अशोक कोळी, शंकर सखाराम तसेच सदानंद देशमुख यासारख्या महत्वपूर्ण ग्रामीण कादंबरीकारांचा समावेश होतो.

१९९० नंतरच्या ग्रामीण कादंब—या महत्वपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण असून ग्रामीण समाजजीवनातील परिवर्तनाचे वास्तवचित्र प्रकट करणा—या अनुभवसंपन्न वर्णन करणा—या कादंबरीकारात सदानंद देशमुख यांचा समावेश होतो. कृषीजीवनाचा बालपणापासून अनुभव असलेल्या देशमुख यांनी कादंबरीबरोबर कथा, ललित गद्य, कविता या प्रकारातही विपूल लेखन केले. शेती व शेतकरी हा त्यांचा जिव्हाळ्याचा असणारा विषय लेखणीतून प्रकट केला. त्यांनी आपल्या 'तहान' कादंबरीतून पाणीटंचाईसारखी मुलभूत समस्या शेतकरी वर्गास कसे संपवते याचा अविष्कार घडविला. तसेच मराठी ग्रामीण कादंबरी विश्वात एक मैलचा दगड म्हणून उल्लेख करता येईल अशी साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कादंबरी म्हणजे 'बारोमास'. ३५० इतकी पृष्ठसंख्या असलेली, २००२ साली प्रकाशित झालेली ही बारोमास कादंबरी बदलत्या ग्रामजीवनातील विविध समस्यांचे वास्तवदर्शी व मर्मग्राही चित्रण करते.



Scanned with OKEN Scanner

मुख्यत: ग्राम जीवनातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांच्या दैन्यावस्थेचा दाहक अविष्कार घडविणारी ही कादंबरी ठरते. हेच मांडण्याचा या शोधनिबंधाद्वारे उद्देश आहे. सर्वांच्या उपजिवीकेचा, अर्थव्यवस्थेचा मुलाधार असणारा शेतकरी बारोमास राबुनही त्याच्या जीवनातील दु:ख, दैन्य कमी झालेले दिसत नाही. जागतिकीकरणाच्या लाटेबरोबर अस्मानी–सुलतानी संकटाने उद्ध्वस्त झालेल्या शेतकरी कुटुंबाची वाताहत, शेतक–यांच्या पिढ्यानपिढ्याची होणारी बरबादी त्यांच्या वाट्यास येणारी अभावग्रस्त स्थिती अनिश्चिततेने भरलेले जीवन याचे गहिरे चित्रण, सूचन ही कादंबरी करते. या कादंबरीत येणा–या समस्येविषयी, प्रेरणेविषयी स्वत: कादंबरीकार सदानंद देशमुखांनी म्हटले आहे, ''माझ्या सभोवतालचा ओला–सुका ग्रामीण परिसर हेच तिचे प्रेरणास्थान आहे ''. यातून या कादंबरीचा मुख्य हेतू स्पष्ट होतो.

या कादंबरीचा नायक एकनाथ हा एक तरुण शेतकरी पुत्र आहे. अनंत अडचणींना सामोरे जात एकनाथ हा एम. ए.बी.एड. पर्यंतचे तर एकनाथचा लहान भाऊ मधुकर डी.एड. पर्यंतचे शिक्षण पूर्ण करतात. दोघांकडेही उच्चशिक्षित पदव्या व गुणवत्ता असूनही नोकरी मिळत नाही. असंख्य अडचणींना तोंड देऊनही शेतक–यांच्या या मुलास बेकारीचा सामना करावा लागतो. मोठ्या जिद्दीने, अपेक्षेने शिक्षण घेऊनही शिक्षणक्षेत्रातही बोकाळलेला भ्रष्टाचार, वशिलेबाजी, गुणवत्तेला बाजूला सारुन अर्थकारणास आलेले अवाजवी महत्व. यामुळे एकनाथचा पूर्ण अपेक्षाभंग, भ्रमनिरास होतो. एकूणच त्याची जगण्याची उमेदच संपून जाते. नोकरीसाठी काही वेळा आपली शेती गहाण ठेवून पैसेही देतो. पण तिथेही त्याची फसवणूक होते. पैसेही परत मिळत नाहीत व नोकरीही मिळत नाही. गहाण ठेवलेल्या शेतजमिनीच्या तुकड्यावर सावकाराचाही ताबा होतो. अस्मानी–सुलतानी संकटे, शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचार, भ्रष्ट व्यवस्थेच्या दुष्टचक्रात सापडलेल्या सुशिक्षित तरुण बेरोजगारांची कोंडी होते. डोनेशन संस्कृतीने अपेक्षाभंग होतो. बेरोजगारीच्या खाईत लोटले जाते. अशा भ्रष्ट व्यवस्थेविषयी संताप व्यक्त करताना एकनाथ म्हणतो, ''आपल्याला खूप शिकायचं होतं. नोकरी करायची होती. शिकलेली बायको करायची होती. वाटत होतं नोकरी लागेल. पण पन्नास ठिकाणी जावून एकच अनुभव अन आता चार लाख रेट झाले. एवढं शिकुनही आपला विकास नाही. तर शिकलो कशाला ? झक मारायला ?'' असा भ्रष्ट प्रशासन व्यवस्थेविषयीचा आक्रोश प्रकट करताना दिसतो. त्यामुळे 'बारोमास' ही ग्रामीण कादंबरी एकनाथसारख्या भ्रष्ट शासनव्यवस्थेचा बळी ठरणा–या सुशिक्षित बेरोजगार तरुणाची हतबलता प्रकट करणारी प्रतिक ठरते.

शेतक–यांच्या मुलांना शिक्षण घेऊनही नोकरी न मिळाल्याने मरणयातना सहन कराव्या लागतात. ही बेरोजगार तरुणांची संख्या वाढत जाताना दिसते. अशा तरुणांची कुटुंबातील इतर सदस्यासोबत जूळवून घेताना सुध्दा घुसमट होते. शहरी संस्कृतीत वाढलेली, पदवीपर्यंतचे शिक्षण घेतलेली एकनाथची पत्नी अलका देखील त्याला कायमची सोडून माहेरी निघून जाते. कारण आपल्या पतीस नोकरी नाही, पांढरपेशा सारखे जीवन आपल्या वाट्यास आता येणारच नाही असे तिला वाटते. नोकरी नाही तर शहरात राहून एखादा व्यवसाय करावा, त्यासाठी लागणारे भांडवल शेती विकुन उभे करावे. असा ती आग्रह धरते. परंतू हे शक्य नसल्याने किंवा कुटुंबातील इतर जेष्ठ मंडळींचा विरोध असल्याने एकनाथची चोहोबाजूंनी कोंडी होते. मानसिकदृष्ट्या त्याचे खच्चीकरण होते. त्यामूळे ही कादंबरी मानसिकदृष्ट्या खच्चीकरण झालेल्या सुशिक्षित बेरोजगार तरुणांचेही प्रतिनिधीत्व करताना दिसते. अगोदरच आपले शेतकरी कुटुंब कर्जात बुडालेले दुसरीकडे शिक्षणक्षेत्रातील भ्रष्टाचाराने त्याच्यासह पत्नी, आई–वडिलांच्या अपेक्षा फोल ठरतात. तो पश्चातापदग्ध होतो. अशा अस्मानी–सुलतानी संकटात अडकलेली व बेकारीच्या खाईत भरडलेला कादंबरीचा नायक एकनाथ म्हणतो, ''पुढं आपल्या खेड्यापाड्याचं भवितव्य काय ? शेतीबाडी पिकत नाही, पिकली तरी मालाला किंमत नाही. पैसा डोयाले दिसत नाही. पैशावाचून भागत नाही. आपल्यासारखी शेतक–याची पोरं शिकलेली नव्हती; तोपर्यंत सारं ठीक होतं. कळते होईतो ढोरामागे, अन कळते झाल्यावर औतामागे .... पण आज शिक्षणामुळे जगातले बरे–वाईट सगळं आपल्याला कळंत. एक दोन तास घेऊन पंधरा–वीस हजार पगार अन दुसरा त्याच पात्रतेचा रोजचे पंधरा रुपये कमावू शकत नाही,'' हे आजच्याा सुशिक्षित तरुणाचे वास्तवदर्शी चित्र असल्याचे मुखरर करतात. शेतक–यांच्या बारोमास जगण्याचे ज्वलंत चित्रण प्रकट करतात. अगदी आधुनिक पद्धतीने शेती करण्याच्या निर्णयातून स्वत:ला झोकून देतो. शेतीचे नवे तंत्रज्ञान कृषीतंज्ञाची व्याख्याने आयोजित करुन शेतकरी बांधवापर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न करतो. नोकरी, संसार, शेतीसंबंधीच्या बाबी मनासारख्या तरीही न घडत गेल्याने त्याच्या पदरी नैराश्य येते. वाट्यास आलेले नैराश्य, हतबलता व्यक्त करताना एकनाथ म्हणतो, '' एम.ए.फर्स्ट क्लास झालो पण ते डोक्यातून तरी जायचे कुठे ? आता कोणाला शिकवावे ? वावरातल्या झाडांना की दगडांना ?'' यातून



Scanned with OKEN Scanner

सुशिक्षित बेरोजगार तरुणाची मनोव्यथा प्रकट होते.

ग्रामजीवनाशी संबंधीत अनेक प्रश्नांची चर्चा ही कादंबरी करते. अस्मानी—सुलतानी संकटास कंटाळून एकनाथचे वडील सुभानराव, मेहुणे रावसाहेबांची आत्महत्या. यामुळे सर्व बाजुंनी कोसळलेल्या दु:खाने एकनाथ पुरता हीन—दीन, व्याकूळ, असहाय् होतो. वैतागलेला भ्रमनिरास झालेला एकनाथही स्वत:स संपवण्याच्या कृतीकडे झुकलेला दिसतो. शेतकरी विश्वास हादरा देणा—या, चहुबाजुंनी जागतिकीकरणा नंतरच्या दुष्टचक्रात सापडलेल्या शेती, शेतकरी व शेतकरी पुत्रांची व्यथा—वेदना तसेच महागाई, कर्जबाजारीपणा, पारंपारिक शेतीस बदल, शेतक—यांच्या आत्महत्या, बेकारी यासारख्या अनेक समस्यांना साकार करणा—या 'बारोमास' कादंबरी संदर्भात डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, '' संस्कृतीच्या दारुन अवस्थेची कथा, भारतीय शासन व्यवस्थेच्या मूल्यहीन बनत जाणा—या रुपाची कथा, केवळ पैशाच्या मागे लागणा—या भ्रष्टाचारी अधिका—यांची कथा, भारतीय कृषी संस्कृतीचे आणि शेतक—यांचे सर्वांगीण शोषण करणा—या सावकारी पाशाची कथा आहे.'' यातून अनेक समस्येसह एकनाथ सारख्या सुशिक्षित बेरोजगार शेतक—यांच्या मुलांचाही दाहक अविष्कार घडवते.

निष्कर्ष —

विविध जीवनक्षेत्रातील घडामोडींना कालसुसंगत शब्दरुप देणा—या मराठी साहित्यास फार मोठी परंपरा लाभलेली आहे. या परंपरेत १९६० नंतर ठळकपणे पुढे आलेल्या प्रवाहापैकी 'ग्रामीण साहित्य' हा एक महत्वपूर्ण प्रवाह आहे. १९९० नंतरच्या सर्वव्यापी जागतिकीकरणाने ग्रामीण साहित्याचेही आशय अभिव्यक्तीसह रुप बदलले. त्यामध्ये मराठी ग्रामीण कादंबरीचेही गौरवशाली व वैशिष्ट्यपूर्ण असे योगदान आहे. त्यामध्यो सदानंद देशमुख यांचा समावेश होतो. समकालीन ग्रामीणा जीवनाचे, कृषीसंस्कृतीचे जीवघेणे वास्तव 'बारोमास' कादंबरीतून मांडले आहे. विशेषत: सुशिक्षित बेरोजगार तरुणांची दाहकता एकनाथ सारख्या नायकाच्या माध्यमातून प्रकट केली आहे. एका नव्या आशा—आकांक्षेने भविष्याची स्वप्ने रंगवणारा, शिक्षणाच्या बळावर भविष्याचे नियोजन करणारा एकनाथसारखा तरुण विद्यार्थी वर्ग बेकारीच्या खाईत लोटला जात आहे. शिक्षणक्षेत्रातील बोकाळलेला भ्रष्टाचार आणि एकुणच भ्रष्ट, बाजारु व्यवस्थेने त्याच्या वाट्यास औदासिन्य, नैराश्य व हतबळता येते. त्यामुळे नव्या पिढीसमोर शेतीबद्दलची उदासीनता व शिक्षण घेउन वाट्यास आलेली बेकारी अशी दुहेरी कोंडी झाल्याचे दिसते. अशा कोंडीत, दुष्टचक्रात सापडलेल्या सुशिक्षित पिढीची अवस्था एकनाथच्या माध्यमातून सदानंद देशमुखांनी मांडली आहे. कृषीव्यवस्थेची वास्तव मांडणारी करणारी ही कादंबरी एकनाथसारख्या सुशिक्षित बेरोजगार तरुणाची कैफियतही मांडते. ते मांडताना कृषीजीवन, शेतकरी कुटुंबाची झालेली दयनिय अवस्था, त्यास कारणीभूत ठरणा—या बाबींना कवेत घेण्याचे काम 'बारोमास' द्वारे कादंबरीकाराने केले आहे. शेतक—यांचे दु:ख व शोषक व्यवस्थेचे रुप उघडे करणारी ही कादंबरी सुशिक्षित बेरोजगार तरुणाचे असहाय्य प्रकटन करते. बेरोजगारांची मनोव्यथा व शोकांतिकेचा पटही उलगडून दाखवते. बारा महिने शेतीशी नाते सांगणा—या, मातीत राबणा—या शेतक—याच्या जीवनावर भाष्य करणारी ही कादंबरी बदलत्या ग्राम वास्तवातील जगणेच अडचणीत सापडलेल्या सुशिक्षित बेरोजगार तरुणांची व्यथा—वेदना साकार करते. म्हणूनच ग्रामीण समाजजीवनातील परिवर्तनाचे वास्तववादी चित्रण करण्याच्या संदर्भात १९९० नंतरच्या ग्रामीण कादंब—यात सदानंद देशमुख यांची 'बारोमास' कादंबरी महत्वपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

संदर्भ —

१. सदानंद देशमुख 'बारोमास' कॉन्टिनेण्टल प्रकाशन, पूणे, प्रथमावृत्ती २००२.
२. संपा.डॉ. पाटील विजय, 'बारोमास : एक अन्वयार्थ, ' कॉन्टिनेण्टल प्रकाशन, पूणे, प्रथमावृत्ती ' २०११.
३. संपा. डॉ. शेळके भास्कर, 'ग्रंथवेध,' शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर प्रथमावृत्ती २०१२.
४. डॉ. श्रीराम गुंदेकर, 'ग्रामीण साहित्य:प्रेरणा आणि प्रयोजन', दिलीपराज प्रकाशन, पूणे १९९९.
५. संपा. डॉ. बनसोडे प्रविण, प्रा. गावंडे शांतरक्षित, ' जागतिकीकरण ग्रामीण साहित्य, कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २४ जाने. २००९.



Scanned with OKEN Scanner